# कृषि पणन विषयक बातम्या : ऑक्टोबर 2023

Agrowon Dt. 28/10/2023

## क्रमवारीत लासलगाव, बारामती बाजार समित्या अव्वल

### 'पणन'कडून राज्यातील बाजार समित्यांची क्रमवारी जाहीर

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : राज्यातील बाजार समित्यांची (२०२२-२३) वार्षिक क्रमवारी पणन संचालनालयामार्फत जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये नाशिक जिल्ह्यातील लासलगाव आणि पुणे जिल्ह्यातील बारामती बाजार समितीने संयुक्तरीत्या पहिला क्रमांक पटकावला आहे.

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राज्यभरातील बाजार समित्यांची २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी पणन संचालनालयाकडून जाहीर करण्यात आली आहे. राज्यातील एकूण ३०५ बाजार समित्यांपैकी लासलगाव आणि बारामती बाजार समिती संयुक्तरीत्या पहिल्या क्रमांकावर असून, वाशीम जिल्ह्यातील कारंजा (लाड) बाजार समिती दुसऱ्या, तर अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर बाजार समिती तिसऱ्या क्रमांकावर असल्याची माहिती, पणन संचालक डॉ. केदारी जाधव यांनी दिली.

स्मार्ट प्रकल्पांतर्गत राज्यामध्ये मागील वर्षापासून अशा प्रकारे बाजार समितीची वार्षिक क्रमवारी जाहीर करण्यात येत आहे. बाजार समितीची क्रमवारी जाहीर झाल्यामुळे इतर बाजार समिती यांच्या तुलनेत शेतकरी शेतीमाल नेत असलेल्या बाजार समितीचे स्थान शेतकऱ्यांना समजणार आहे. तसेच यामुळे शेतकऱ्यांना आकर्षित करण्यासाठी अधिकाधिक सुविधा देण्याची निकोप स्पर्धा बाजार समितीमध्ये निर्माण होण्यास चालना मिळणार आहे.

पान ४ वर »

## क्रमवारीत लासलगाव, बारामती बाजार समित्या अव्वल

» पान १ वरून

जागतिक बँकेच्या सहकार्याने राज्यात बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन अर्थात स्मार्ट प्रकल्प सुरू आहे. बाजार समित्यांची क्रमवारी निश्चित करण्यासाठी पणन संचालनालय कार्यालयाकडून जागतिक बँकेच्या सूचनेनुसार शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या विक्री व्यवस्थेसाठी बाजार समितीत असलेल्या पायाभूत व इतर सुविधा, आर्थिक व वैधानिक कामकाज, योजना, उपक्रम राबविण्यातील सहभाग यानुसार एकूण ३५ निकष तयार करण्यात आलेले होते.

**मुंबई, नाशिक, नागपूरचा समावेश नाही**

राज्यातील सर्वाधिक उलाढाल असलेल्या आणि राजकारणाचा केंद्रबिंदू असलेल्या मुंबई, नाशिक, नागपूर या महत्त्वाच्या बाजार समित्यांचा क्रमवारीमध्ये समावेश झालेला नाही. या बाजार समित्या विविध कारणांनी चर्चेत असतात. मात्र या बाजार समित्यांची आर्थिक उलाढाल मोठी असली तरी पायाभूत सुविधा देण्यापासून या बाजार समित्या दूर असल्याचे सातत्याने समोर आले आहे.

पुढारी Dt. 19/10/2023

# सहा रब्बी पिकांवरील 'एमएसपी'मध्ये मोठी वाढ

## केंद्र सरकारची शेतकऱ्यांनाही दिवाळी भेट

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय कर्मचाऱ्यांसोबतच केंद्र सरकारने देशभरातील शेतकऱ्यांनाही दिवाळीपूर्वी आनंदाची बातमी दिली आहे. गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत सहा रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यासह लडाखमध्ये १३ गिगावॅट पारंपरिक ऊर्जा प्रकल्पासाठी हरित ऊर्जा कॉरिडोरच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये आंतरराज्य वितरण व्यवस्था उभारण्याचाही निर्णयही घेण्यात आला.

कृषी मूल्य आयोगाच्या शिफारशींच्या आधारे ही वाढ करण्यात आल्याचे केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी सांगितले. यांतर्गत मोहरीची 'एमएसपी' प्रतिक्विंटल २०० रुपयांनी वाढविण्यात आली आहे. मसूरच्या



| पिकाचे नाव | 'एमएसपी' (२०२३-२४) | वाढीव 'एमएसपी' (२०२४-२५) |
|---|---|---|
| गहू | २,१२५ | २,२७५ |
| जवस | १,७३५ | १,८५० |
| हरभरा | ५,३३५ | ५,४४० |
| मसूर | ६,००० | ६,४२५ |
| मोहरी | ५,४५० | ५,६५० |
| करडई | ५,६५० | ५,८०० |

'एमएसपी'मध्ये ४२५ रुपये प्रतिक्विंटल वाढ करण्यात आली आहे. याखेरीज गव्हाची 'एमएसपी' १५० रुपये, जवसची 'एमएसपी' ११५ रुपये, हरभऱ्याची 'एमएसपी' १०५ रुपये प्रतिक्विंटल आणि करडई पिकाची 'एमएसपी' १५० रुपये प्रतिक्विंटलने वाढविण्यात आली आहे. २०१४ पासून या पिकांच्या 'एमएसपी'मध्ये लक्षणीय प्रमाणात वाढ झाल्याचा दावाही ठाकूर यांनी केला.

किमान आधारभूत किंमत (एमएसपी) ही काही कृषी उत्पादनांसाठी सरकारने निर्धारित केलेली किमान किंमत आहे. याच्याआधारे सरकार शेतकऱ्यांकडून पिकांची खरेदी करते. एखाद्या शेतकऱ्याला त्याच्या पिकाला खुल्या बाजारात योग्य भाव मिळत नसेल आणि त्याला पीक विकायचे असेल, तर सरकार त्या शेतकऱ्याकडून 'एमएसपी'द्वारे पिकाची खरेदी करते.

Pune Gramin Edition
Oct 19, 2023 Page No. 2
newspaper.pudhari.co.in


# 'एनएचआरडीएफ'च्या सुधारित कांदाचाळीत सड ५० टक्के कमी

## 'आंशिक वातावरणीय नियंत्रित कांदा साठवणगृह' फायदेशीर

मुकुंद पिंगळे : ॲग्रोवन वृत्तसेवा Dt. 19/10/2023

नाशिक : उन्हाळ कांदा साठवणूकपश्चात पारंपरिक पद्धतीने साठवणूक केल्यास सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत कांद्याची सड सरासरी २५ ते ३० टक्क्यांवर होते. परिणामी, विक्रीवेळी कांदा उपलब्धता व वजन कमी झाल्याने संभाव्य उत्पन्नावर परिणाम होतो. या समस्येवर पर्याय देण्यासाठी राष्ट्रीय फलोत्पादन संशोधन विकास प्रतिष्ठान 'एनएचआरडीएफ'च्या तज्ज्ञांनी २५ टन क्षमतेचे सुधारित 'आंशिक वातावरणीय नियंत्रित कांदा साठवणगृह' विकसित केले आहे. यासंबंधी साठवणूक निरीक्षणे नोंदविण्यात आली आहेत. त्यामध्ये ५० टक्क्यांवर कांदा सड कमी झाल्याचे समोर आले आहे.

पान ४ वर »



गणोरे, ता. अकोले, जि. नगर : येथील शेतकरी मिलिंद आंबरे यांनी तयार केलेली सुधारित पद्धतीची कांदाचाळ.

# 'एनएचआरडीएफ'च्या सुधारित कांदाचाळीत सड ५० टक्के कमी

» पान १ वरून

वातावरणीय बदल व तापमान वाढ या दोन प्रमुख कारणांनी कांदा सडण्याचे प्रमाण वाढत आहे. ही समस्या विचारात घेऊन २०१७ मध्ये कुंदेवाडी (सिन्नर) येथील 'एनएचआरडीएफ'च्या प्रक्षेत्रावर संशोधन सुरू झाले. त्यातून २५ टन क्षमतेचे 'आंशिक वातावरणीय नियंत्रित कांदा साठवणगृह'विकसित झाले. या प्रकल्पात 'एनएचआरडीएफ'चे अतिरिक्त संचालक डॉ. पी. के. गुप्ता, डॉ. भास्कर, वरिष्ठ तंत्र अधिकारी तुषार आंबरे, तंत्र सहाय्यक बी. पी. रायते यांचा सहभाग होता. यासंबंधी शोधनिबंध 'व्हेजिटेबल सायन्स' या जर्नलमध्ये जुलै-डिसेंबर २०२० मध्ये प्रकाशित झाला. यात सातत्याने सुधारणा करून ते आता नावारूपास आले आहे.

प्रामुख्याने ऑगस्ट ते नोव्हेंबरदरम्यान कांद्याचा पुरवठा बाजारात कमी होत असतो. त्यामुळे या कालावधीत कांद्याची टप्प्याटप्प्याने विक्री करत शेतकरी साठवणुकीचे नियोजन करत असतात. मात्र वातावरण बदल तसेच तापमानवाढीमुळे शेतकऱ्यांसमोर अडचणी वाढत्या आहेत. या समस्येवर 'एनएचआरडीएफ'च्या टीमने कांदा साठवणूक संबंधी केलेले संशोधन महत्त्वपूर्ण ठरेल. यामध्ये हवा खेळती ठेवून कांदा साठवणूक गृहाची संरचना तयार केली आहे. ज्यामध्ये तापमान व आर्द्रते शिवाय योग्य वायुविजन उपलब्ध होते. यात साठवणूक काळात तापमान व सापेक्ष आर्द्रता नियंत्रित ठेवण्यासाठी योजना केली आहे.

भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या फलोत्पादन व पीक विज्ञान विभागाचे उपमहासंचालक डॉ. ए. के. सिंह, भारतीय कृषी शास्त्रज्ञ निवड मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. कीर्ती सिंग, तत्कालीन प्रधान कृषी सचिव एकनाथ डवले, कृषी विभागाचे फलोत्पादन विभागाचे संचालक डॉ. कैलास मोते यांनी या साठवणूक गृहाची पाहणी केली आहे.

### २५ टन साठवणूक गृह रचना व खर्च

- ३५ बाय १४ फूट व १० फूट उंच सिमेंट बांधकाम
- खालील तळ भागासाठी २० बाय २० मिमी वेल्ड जाळी
- ४ एक्झॉस्ट फॅन (१८,१४०० आरपी एम)
- ४ एक्सहॉस्ट फॅन (भिंतीवरील)
- विद्युत जोडणी, ४ लोखंडी ड्रम
- ६ महिने विद्युत खर्च...११,२८०
- एकूण खर्च २ लाख ९७ हजार (आर्थिक वर्ष २०१८-१९ प्रमाणे) (फॅन, ड्रम व जाळीचे आयुष्य १० वर्षांपर्यंत गृहीत धरता येईल.)

### तुलनात्मक स्थिती
(२५ टन क्षमता साठवणूक)

| बाब | सुधारित साठवणूक | पारंपरिक साठवणूक |
|---|---|---|
| मोड येणे | ०.१७ | ४.१५ |
| कांदा सड | १.४ | १२.८३ |
| शारीरिक वजन घट | १४.२ | १९.९५ |
| कांदा पुनर्प्राप्ती (रिकव्हरी टक्के) | ८४.८ | ६३.१ |
| एकूण नुकसान टक्के | १५.२३ | ३६.९२ |

**" कमी खर्चात व कमी जागेत कांदा साठवणूक पर्याय शेतकऱ्यांसाठी उपलब्ध झाला आहे. सहा महिने साठवणुकीसाठी वापर केल्यानंतर जागेचा पुनर्वापर शक्य आहे. या मॉडेलची मांडणी शासकीय यंत्रणांकडे केली आहे. अनुदानासाठी विचाराधीन आहे.**

**- डॉ. पी. के. गुप्ता**, अतिरिक्त संचालक, एनएचआरडीएफ, नवी दिल्ली

### शेतकऱ्यांकडून अवलंब; यशस्वी परिणाम

कुंदेवाडी (ता. सिन्नर) येथील प्रक्षेत्रामधील सुधारित साठवणूकगृह पाहून गणोरे (ता. अकोले, जि. नगर) येथील शेतकरी मिलिंद आंबरे व गोरख आंबरे यांनी त्याची उभारणी केली. ऑक्टोबरच्या दुसऱ्या सप्ताहअखेर कांदा चाळींत नुकसान तुलनेत कमी दिसून आले, तर कांदा रंग त्यावरील आवरण व प्रतवारी टिकून राहिली. ज्या कांद्याची सड झाली ते कांदे जागीच शुष्क झाले. त्यामुळे लगतच्या कांद्यांना सड झालेली नाही. प्रतवारी उच्च दर्जाची असल्याने कांदा बियाणे कंपनीने हा कांदा प्रतिक्विंटल ३ हजार रुपयांनी खरेदी केल्याचे आंबरे यांनी सांगितले. शनिवारी (ता. १४) प्रक्षेत्र दिवस घेण्यात आला. त्यामध्ये नाशिक व नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी यासंबंधीचे कामकाज प्रत्यक्ष अनुभवले.

अॅग्रोवन
Agrowon Dt. 19/10/2023

# तारण सोयाबीनवरील साडेसहा लाख रुपयांचे व्याज माफ

## हिंगणघाट बाजार समितीचा ऐतिहासिक निर्णय

**विनोद इंगोले : अॅग्रोवन वृत्तसेवा**

वर्धा : दरवाढीच्या अपेक्षेने शेतकऱ्यांनी सोयाबीनची साठवणूक केली. मात्र हंगाम संपून नव्या हंगामातील सोयाबीन बाजारात दाखल झाले तरीही दर पाच हजारांच्या पुढे गेले नाहीत. परिणामी, तारण ठेवलेल्या सोयाबीनपोटी शेतकऱ्यांना व्याजाचा मोठा भुर्दंड बसणार होता. त्यामुळे हिंगणघाट बाजार समितीने सोयाबीनवरील तारण व्याजाचे तब्बल ६ लाख ७१ हजार ३८१ रुपये बाजार समितीने माफ करीत सोयाबीन उत्पादकांना दिलासा दिला आहे.

हिंगणघाट बाजार समितीने अभियांत्रिकीला प्रवेशित शेतकरी, मजुरांच्या पाल्यांना अनुदानावर लॅपटॉप देण्याची योजना नुकतीच जाहीर केली. त्यानंतर आता सोयाबीनचे दर न वाढल्याने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी बाजार समिती पुढे आली. गेल्या हंगामात अतिवृष्टीमुळे



सोयाबीनचे मातेरे झाले. यंदा बुरशीजन्य रोगांमुळे ऐन काढणीपूर्वी सोयाबीन पिवळे पडून करपले. त्याचा उत्पादकतेवर परिणाम झाला. अनेक भागात एकरी एक ते दोन क्विंटलची उत्पादकता मिळत आहे. गेल्या हंगामातील सोयाबीन दरवाढीच्या अपेक्षेने शेतकऱ्यांनी हिंगणघाट बाजार समितीकडे तारण ठेवले होते. मात्र दर पाच हजारांच्या खालीच आहेत. दरही वाढले नाहीत आणि तारण ठेवलेल्या शेतमालावर सहा टक्के व्याज द्यावे लागणार, यामुळे बाजार समितीचे सभापती अॅड. सुधीर कोठारी, उपसभापती हरीश वडतकर, संचालक मधुकर डंभारे, प्रफुल्ल बाडे, मधुसूदन हरणे, ओमप्रकाश डालिया, उत्तम भोयर, अशोक उपासे,

> **सोयाबीन दर वाढतील या अपेक्षेने गेल्या हंगामात ते तारण ठेवले. दर वाढलेच नाहीत. परंतु तारण कर्ज व त्यावरील व्याज चुकवावे लागणार आहे. यात शेतकऱ्यांची होणारी घालमेल लक्षात घेता ६ लाख ७१ हजार ३८१ रुपये तारण कर्जावरील व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला.**
>
> **- अॅड. सुधीर कोठारी,**
> सभापती, बाजार समिती हिंगणघाट

राजेश मंगेकर, डॉ. निर्मेश कोठारी, घनश्याम येरलेकर आदींनी तारण कर्ज माफीचा निर्णय घेतला. शेतीमाल तारणावर सहा महिन्यानंतर आठ टक्के व्याजाची आकारणी होते. त्यानुसार १११ शेतकऱ्यांचा ३६८८ क्विंटल शेतीमाल तारण होता. सोबतच त्याचा ६७ हजार रुपयांचा विमा उतरविला होता. ही संपूर्ण व्याजाची रक्कम व विमा रक्कम माफ केली आहे.

# ‘ई–नाम’ राबविणारे बारामतीचे रेशीम मार्केट देशात पहिले

## ‘पणन’चे सहायक व्यवस्थापक महेंद्र लोखंडे यांचा दावा

Agrowon Dt. 19/10/2023

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : ‘‘बारामती रेशीम कोष मार्केट हे ई-नाम प्रणालीद्वारे १०० टक्के ऑनलाइन काम करणारे देशातील पहिले मार्केट आहे. ‘ई-नाम’मध्ये रेशीम कोषाचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये देशातील खरेदीदार सहभागी होत आहेत. त्यामुळे रेशीम कोषास चांगला दर मिळत आहे,’’ असे मत पणन मंडळाचे सहायक व्यवस्थापक महेंद्र लोखंडे यांनी व्यक्त केले.

बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रेशीम कोष खरेदी-विक्री बाजारपेठ व रेशीम कार्यालयातर्फे सुरू केलेल्या रेशीम कोष मार्केटमध्ये ‘ई-नाम’ पद्धतीने कोष लिलावाच्या वर्षपूर्तीनिमित्त रेशीम शेतकरी व रिलर्स मेळावा नुकताच घेण्यात आला. समितीचे सभापती सुनील पवार अध्यक्षस्थानी होते. या वेळी प्रादेशिक रेशीम कार्यालयाच्या सहायक संचालक डॉ. कविता देशपांडे, पणन मंडळाचे एजीएम महेंद्र लोखंडे, रेशीम तांत्रिक सेवा केंद्राचे शास्त्रज्ञ शिवकुमार हुक्केरी, शास्त्रज्ञ हुमायून शरीफ, बाजार समितीचे उपसभापती नीलेश लडकत, सदस्य बापूराव कोकरे, विनायक गावडे, सतीश जगताप, दयाराम महाडीक, सांगलीचे जिल्हा रेशीम अधिकारी बापूराव कुलकर्णी, मुरलीधर कुट्टे, समितीचे सचिव अरविंद जगताप आदी उपस्थित होते.

### ‘खासगी व्यापाऱ्यांना कोष विकू नका’

शेतकऱ्यांनी खासगी व्यापाऱ्यांना रेशीम कोष विक्री करू नयेत. त्यामध्ये फसवणूक होऊ शकते. तसेच भविष्यातील धोके विचारात घेऊन रेशीम कोष उत्पादकांनी कोष बारामती मार्केटमध्येच विक्रीस आणावा. खरेदीदार व रिलर्सनी परस्पर व थेट कोष खरेदी करू नयेत, असे आवाहन या वेळी करण्यात आले.



पवार म्हणाले, ‘‘बारामती रेशीम कोष मार्केटमध्ये चांगली विक्री व्यवस्था आहे. अन्य राज्यांतील बाजारांप्रमाणे दर देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या समितीतर्फे शेतकरी व रिलर्स यांना परवाना देण्यात येईल. त्यामुळे सर्व रिलर्सनी परवाने घेऊन ई-नाम प्रणालीत नोंदणी करवा. ई-नाम पद्धती असल्याने देशातील रिलर्स व खरेदीदार यामध्ये भाग घेऊ शकतात. त्यामुळे रिलर्सना एकाच ठिकाणी कोष मिळतील. शेतकऱ्यांना ही जादा रिलर्स सहभागी झाल्यास स्पर्धा होऊन कोषास चांगला दर मिळेल. त्याचा आर्थिक फायदा होऊन त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळेल. कोष ग्रेडिंग करून आणावेत. त्यामुळे प्रतवारीनुसार कोषास योग्य दर मिळेल.’’

पुण्यनगरी

# शेतकऱ्यांनी कृषि पणन मंडळाच्या शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ घ्यावा

## जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

बुलढाणा, दि. १७ (प्रतिनिधी)

शेतकरी आपला शेतमाल काढणी नंतर आर्थिक निकडीमुळे त्वरीत विक्रीसाठी बाजारात आणतात. विक्रीसाठी एकाचवेळी बाजारपेठेत शेतमालाची मोठ्या प्रमाणात आवक होते त्यामुळे बाजारभाव कमी होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. शेतकऱ्यांनी शेतमालाची काही काळासाठी साठवणूक करुन बाजारभाव चांगले असताना साठवणुकीतील शेतमाल टप्याटप्याने विक्रीसाठी आणला तर शेतकऱ्यांना त्याचा फायदा होऊ शकतो. यासाठी शेतकऱ्यांनी कृषि पणन मंडळाच्या शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

शेतकऱ्यांना असणारी आर्थिक निकड पुर्ण होऊन, त्यांच्या शेतीमालासाठी रास्त भाव मिळावा या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत सन १९९०-९१ पासून शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी बाजार समितीच्या गोदामात अथवा वखार महामंडळाच्या गोदामात ठेवलेल्या शेतमालाच्या गोदाम पावतीवर शेतमालाच्या चालू बाजारभावानुसार रकमेच्या ७५ टक्के पर्यंतची रक्कम त्या शेतकऱ्यास १८० दिवसांच्या मुदतीसाठी ६ टक्के व्याजाने तारण कर्ज बाजार समितीकडून त्वरीत देण्यात येते. शेतमाल तारण कर्ज योजनेत तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सुर्यफूल, चना, भात (धान), करडई, ज्वारी, बाजरी, मका, गहू, वाघ्या घेवडा (राजमा), बेदाणा, हळद, काजू बी व



सुपारी अशा पिकांचा समावेश केलेला आहे. शेतमाल तारण कर्ज योजनेअंतर्गत फक्त उत्पादक शेतकऱ्यांचा शेतमाल स्वीकारला जातो. व्यापाऱ्यांचा शेतमाल या योजनेअंतर्गत स्विकारला जात नाही. प्रत्यक्षात तारणात ठेवण्यात आलेल्या तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सुर्यफूल, चना, भात (धान), करडई, ज्वारी, बाजरी, मका, गहू, वाघ्या घेवडा (राजमा), बेदाणा, हळद, काजू बी व सुपारी या १७ शेतीमालाच्या बाजारभावाच्या एकूण किमतीच्या ७५ टक्के पर्यंतचे कर्ज वार्षीक ६ टक्के व्याज दराने योजनेस सुरूवात केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांचे (१८० दिवस) मुदतीकरीता अदा करण्यात येते. बाजार समितीमध्ये शेतक-याचा आधारकार्ड क्रमांक घेऊन व त्याची खात्री करूनच तारण कर्ज अदा केल्या जाते. प्रत्यक्षात तारण ठेवलेल्या शेतमालाची किंमत ही तत्कालीन बाजारभाव किंवा शासनाने जाहिर केलेली आधारभूत किंमत यापैकी जी कमी असेल त्यानुसार ठरविण्यात येते.

शेतकऱ्यांनी राज्य वखार महामंडळ, केंद्रीय वखार महामंडळ डब्ल्यू. डी. आर. ए. यांच्या मानकांची पूर्तता करणाऱ्या गोदामात ठेवलेल्या शेतमालाच्या वखार पावतीवर सुध्दा शेतकऱ्यांना बाजार समिती मार्फत या योजने अंतर्गत लाभ देण्यात येतो. शेतकऱ्यांन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव यांच्याशी संपर्क साधून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

Smart Buldhana Edition
Oct 18, 2023 Page No. 2
Powered by : eReleGo.com

लोकमत Dt. 18/10/2023

# शेतमाल आला, पण बाजार भाव कमी, चिंता कशाला!

## कृषी पणन मंडळाच्या शेतमाल तारण कर्ज योजनेचा होणार लाभ

इन्फो स्टोरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**बुलढाणा :** शेतमालाला भाव कमी असताना शेतकऱ्यांना बाजार समितीच्या गोदामात त्या मालाची साठवणूक करून बाजारभाव चांगले मिळाल्यानंतर तो शेतमाल टप्प्याटप्प्याने विक्रीसाठी आणला, तर त्याचा फायदा होऊ शकतो. त्यासाठी कृषी पणन मंडळाच्या शेतमाल तारण कर्ज योजनेंतर्गत शेतकऱ्यांना कर्ज देण्यात येत असल्याने भाव कमी असल्यास शेतकऱ्यांना चिंता करण्याची गरज नाही.

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतमाल काढणी हंगामात त्याच्या आर्थिक निकडीमुळे त्वरित विक्रीसाठी बाजारात आणतात. विक्रीसाठी एकाचवेळी बाजारपेठेत शेतमालाची मोठ्या प्रमाणात आवक होते व बाजारभाव कमी होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते.




### बाजारभावाच्या एकूण किमतीच्या ७५ टक्क्यापर्यंतचे कर्ज

शेतमाल तारण कर्ज योजनेंतर्गत फक्त उत्पादक शेतकऱ्यांचा शेतमाल स्वीकारला जातो. व्यापाऱ्यांचा शेतमाल या योजनेंतर्गत स्वीकारला जात नाही. शेतीमालाच्या बाजारभावाच्या एकूण किमतीच्या ७५ टक्क्यांपर्यंतचे कर्ज वार्षिक ६ टक्के व्याज दराने योजनेस सुरुवात केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांचे (१८० दिवस) मुदतीकरिता अदा करण्यात येते.

### शेतकऱ्यांना फायदा

शेतकऱ्यांनी शेतमालाची काही काळासाठी साठवणूक करून बाजारभाव चांगले असताना साठवणुकीतील शेतमाल टप्प्याटप्प्याने विक्रीसाठी आणला तर शेतकऱ्यांना त्याचा फायदा होऊ शकतो. शेतकऱ्यांना असणारी आर्थिक निकड पूर्ण होऊन, त्यांच्या शेतीमालासाठी रास्त भाव मिळावा, या दृष्टिकोनातून, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत १९९०-९१ पासून शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यात येत आहे.

### महामंडळाच्या किंवा बाजार समितीच्या गोदामात माल सुरक्षितता

या योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी बाजार समितीच्या गोदामात अथवा वखार महामंडळाच्या गोदामात ठेवलेल्या शेतमालाच्या गोदाम पावतीवर शेतमालाच्या चालू बाजारभावानुसार रक्कम त्या शेतकऱ्यास ६ टक्के व्याजाने तारण कर्जबाजार समितीकडून त्वरित देण्यात येते. गोदामात मालही सुरक्षित ठेवण्यात येतो.

### या पिकांचा आहे समावेश

- शेतमाल तारण कर्ज योजनेत तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सूर्यफूल, चना, भात (धान), करडई, ज्वारी, बाजरी, मका, गहू, वाघ्या घेवडा (राजमा), बेदाणा, हळद, काजू बी व सुपारी अशा पिकांचा समावेश केलेला आहे.

पुढारी Dt. 17/10/2023

# बारामतीत रेशीम शेतकरी व रिलर्स मेळावा

बारामती : पुढारी वृत्तसेवा

बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीचे रेशीम कोष खरेदी-विक्री बाजारपेठ व प्रादेशिक व जिल्हा रेशीम कार्यालय यांचे संयुक्त विद्यमाने रेशीम कोष मार्केटमध्ये सुरू केलेल्या ई-नाम पद्धतीने कोष लिलावाची वर्षपूर्ती झाली. यानिमित्त रेशीम शेतकरी व रिलर्स मेळावा बाजार समितीचे सभापती सुनील पवार यांचे अध्यक्षतेखाली आणि पुणे येथील प्रादेशिक रेशीम कार्यालयाच्या सहायक संचालक डॉ. कविता देशपांडे यांच्या उपस्थितीत पार पडला.

बारामती रेशीम कोष मार्केटमध्ये चांगली विक्री व्यवस्था, तसेच इतर व बाहेरील राज्यातील मार्केटप्रमाणे दर मिळतील, याबाबत बाजार समिती प्रयत्नशील आहे. समितीतर्फे शेतकरी व रिलर्स यांना संबंधित सुविधा व लायसन्स उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ई-नाम पद्धती असल्याने देशातील रिलर्स व खरेदीदार यामध्ये भाग घेऊ शकतात. त्यांना एकाच ठिकाणी कोष मिळतील व शेतकऱ्यांना देखील जादा रिलर्स सहभागी झाल्यास स्पर्धा होऊन कोषास चांगला दर मिळेल.



बारामती बाजार समितीत रेशीम शेतकरी व रिलर्स मेळावा पार पडला.

शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होईल, यासाठी शेतकऱ्यांनी आपले कोष ग्रेडिंग करून आणावेत. त्यामुळे प्रतवारीनुसार कोषास योग्य दर मिळेल. शेतकऱ्यांना कोषास चांगला दर मिळाल्यास शेतकऱ्यांची संख्या वाढून जादा कोष विक्रीस येतील. त्यामुळे शेतकरी व रिलर्स यांनी एकमेकांना सहकार्य केल्यास बारामती मार्केट हे भविष्यात मोठे कोष मार्केट तयार होईल, असे मत सभापती सुनील पवार यांनी या वेळी व्यक्त केले.

या वेळी डॉ. कविता देशपांडे यांनी रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच रेशीम विभागामार्फत शासकीय योजनांची माहिती दिली. शेतकऱ्यांनी सिल्क सामग्री व मनरेगा या शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले. राज्यातील सांगली, कराड, कोल्हापूर, तसेच कर्नाटक, तेलंगणा, हैद्राबाद, तमिळनाडू येथील रिलर्स यांचेबरोबर संवाद साधून यांच्या अडचणी व समस्या समजावून घेण्यात आल्या. पणन मंडळाचे सह व्यवस्थापक लोखंडे यांनी ई-नाम प्रणाली, तसेच ई-नाम ऑनलाईन ऑक्शन, ई- पेमेंट इत्यादीची माहिती दिली. बारामती रेशीम कोष मार्केट हे ई-नाम प्रणालीद्वारे ऑनलाईन ऑक्शन करणारे देशातील हे पहिले मार्केट असल्याचे सांगितले. या वेळी रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना उझी माशीचे नियंत्रणबाबत शास्त्रज्ञ हुमायुन शरीफ यांनी मार्गदर्शन केले.

या वेळी रेशीम तांत्रिक सेवा केंद्र धारवाडचे हुक्केरी, हुमायुन शरीफ, उपसभापती नीलेश लडकत, सदस्य बापूराव कोकरे, विनायक गावडे, सतीश जगताप, दयाराम महाडिक, रामचंद्र खलाटे, युवराज देवकाते, शुभम ठोंबरे, तसेच जिल्हा रेशीम अधिकारी बापूराव कुलकर्णी, मुरलीधर कुट्टे, सचिव अरविंद जगताप व रेशीम उत्पादक शेतकरी व रिलर्स उपस्थित होते. पुणे जिल्हा रेशीम विकास अधिकारी संजय फुले यांनी प्रास्ताविक केले. संदीप आगवणे यांनी आभार मानले.

# हिंगणघाट बाजार समिती देणार शेतकरी पाल्यांना लॅपटॉप

**अॅग्रोवन वृत्तसेवा** Dt. 13/10/2023

वर्धा : अभियांत्रिकीतील प्रवेशित शेतकरी पाल्यांना अनुदानावर लॅपटॉप वितरणाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हिंगणघाट बाजार समितीकडून राबविला जात आहे. कोरोनाकाळात या योजनेच्या अंमलबजावणीला खीळ बसल्यानंतर या वर्षी पुन्हा विद्यार्थ्यांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

हिंगणघाट बाजार समितीच्या वतीने शेतकरी पाल्यांना उच्चशिक्षण मिळावे, याकरिता २०११-१२ या वर्षापासून लॅपटॉप वितरणाची योजना सुरू करण्यात आली. कोरोना आणि बाजार समिती निवडणूक प्रक्रियेमुळे तीन वर्ष ही योजना कार्यान्वित करता आली नाही; परंतु शेतकरी पाल्यांकडून मागणी झाल्याने यंदापासून पुन्हा ही योजना कार्यान्वित होईल. हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यांतील शेतकरी व शेतमजुरांना याचा लाभ घेता येईल. अभियांत्रिकीच्या द्वितीय वर्षाला संबंधित विद्यार्थी प्रवेशित असावा, असा निकष आहे. पालकाचा शेतीशिवाय दुसरा कोणताही व्यवसाय नसावा, अर्जासोबत गुणपत्रिका आणि द्वितीय वर्षात प्रवेश घेतल्याची पावती जोडावी, बोनाफाइड प्रमाणपत्र, सातबारा, निव्वळ शेती व्यवसाय असल्याबाबतचे तलाठी प्रमाणपत्र तसेच शंभर रुपयांच्या मुद्रांक शुल्कावर शपथपत्र, असे दस्तऐवज प्रस्तावासोबत जोडावे लागतात. आलेल्या प्रस्तावाची खातरजमा वर्धा येथील एका अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून होते. त्यानंतर संबंधितांना योजनेच्या लाभासाठी पात्र ठरविण्यात येते. पात्र लाभार्थ्यांना लॅपटॉप किमतीच्या ५० टक्के रक्कम जमा करावी लागते.

**“ गेल्या दहा वर्षांपासून या उपक्रमात सातत्य राखण्यात आले आहे. दरवर्षी ६५ ते ७० लॅपटॉप वितरित केले जातात. निविदेच्या माध्यमातून लॅपटॉप खरेदी होतात. त्यामुळे कमी दरात ते मिळतात आणि विद्यार्थ्यांना एकूण रकमेच्या ५० टक्के रक्कमच द्यावी लागते.**

– सुधीर कोठारी, सभापती, बाजार समिती हिंगणघाट

Agrowon Dt. 09/10/2023

# तारण सोयाबीनवरील साडेसहा लाख रुपयांचे व्याज माफ

## हिंगणघाट बाजार समितीचा ऐतिहासिक निर्णय

विनोद इंगोले : ॲग्रोवन वृत्तसेवा

वर्धा : दरवाढीच्या अपेक्षेने शेतकऱ्यांनी सोयाबीनची साठवणूक केली. मात्र हंगाम संपून नव्या हंगामातील सोयाबीन बाजारात दाखल झाले तरीही दर पाच हजारांच्या पुढे गेले नाहीत. परिणामी, तारण ठेवलेल्या सोयाबीनपोटी शेतकऱ्यांना व्याजाचा मोठा भुर्दंड बसणार होता. त्यामुळे हिंगणघाट बाजार समितीने सोयाबीनवरील तारण व्याजाचे तब्बल ६ लाख ७१ हजार ३८१ रुपये बाजार समितीने माफ करीत सोयाबीन उत्पादकांना दिलासा दिला आहे.

हिंगणघाट बाजार समितीने अभियांत्रिकीला प्रवेशित शेतकरी, मजुरांच्या पाल्यांना अनुदानावर लॅपटॉप देण्याची योजना नुकतीच जाहीर केली. त्यानंतर आता सोयाबीनचे दर न वाढल्याने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी बाजार समिती पुढे आली. गेल्या हंगामात अतिवृष्टीमुळे



सोयाबीनचे मातेरे झाले. यंदा बुरशीजन्य रोगांमुळे ऐन काढणीपूर्वी सोयाबीन पिवळे पडून करपले. त्याचा उत्पादकतेवर परिणाम झाला. अनेक भागात एकरी एक ते दोन क्विंटलची उत्पादकता मिळत आहे. गेल्या हंगामातील सोयाबीन दरवाढीच्या अपेक्षेने शेतकऱ्यांनी हिंगणघाट बाजार समितीकडे तारण ठेवले होते. मात्र दर पाच हजारांच्या खालीच आहेत. दरही वाढले नाहीत आणि तारण ठेवलेल्या शेतमालावर सहा टक्के व्याज द्यावे लागणार, यामुळे बाजार समितीचे सभापती ॲड. सुधीर कोठारी, उपसभापती हरीश वडतकर, संचालक मधुकर डंभारे, प्रफुल्ल बाडे, मधुसूदन हरणे, ओमप्रकाश डालिया, उत्तम भोयर, अशोक उपासे,

> **सोयाबीन दर वाढतील या अपेक्षेने गेल्या हंगामात ते तारण ठेवले. दर वाढलेच नाहीत. परंतु तारण कर्ज व त्यावरील व्याज चुकवावे लागणार आहे. यात शेतकऱ्यांची होणारी घालमेल लक्षात घेता ६ लाख ७१ हजार ३८१ रुपये तारण कर्जावरील व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला.**
>
> **- ॲड. सुधीर कोठारी,**
> सभापती, बाजार समिती हिंगणघाट

राजेश मंगेकर, डॉ. निर्मेश कोठारी, घनश्याम येरलेकर आदींनी तारण कर्ज माफीचा निर्णय घेतला. शेतीमाल तारणावर सहा महिन्यानंतर आठ टक्के व्याजाची आकारणी होते. त्यानुसार १११ शेतकऱ्यांचा ३६८८ क्विंटल शेतीमाल तारण होता. सोबतच त्याचा ६७ हजार रुपयांचा विमा उतरविला होता. ही संपूर्ण व्याजाची रक्कम व विमा रक्कम माफ केली आहे.

## मंत्री अब्दुल सत्तार यांचे आश्वासन; पुण्यात राज्य व्यापारी परिषद, कायद्यात बदलासाठी प्रयत्न

Sakal Dt. 06/10/2023

# बाजार समित्या बंद करणार नाही



**गणेश कला क्रीडा केंद्र, पुणे : महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या वतीने आयोजित राज्य व्यापारी परिषदेचे उद्‌घाटन गुरुवारी अब्दुल सत्तार यांच्या हस्ते झाले. या वेळी राज्यातील विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.**

पुणे, ता. ५ : ''शेतकऱ्यांच्या मालाचे योग्य वजन आणि रास्त भाव मिळावा, या हेतूने बाजार समित्यांची स्थापना करण्यात आली. त्यामुळे त्या बंद करणे शक्य नाही. परंतु बाजार समिती कायद्यातील काही तरतुदी जाचक असतील आणि त्याचा त्रास व्यापाऱ्यांना होत असल्यास त्यात बदल करण्यासाठी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री यांच्याबरोबर व्यापारी संघटनांची बैठक घेऊ. या बदलांबाबतचे विधेयक आगामी हिवाळी अधिवेशनात आणण्यासाठी प्रयत्न करू,'' असे आश्वासन पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी गुरुवारी दिले.

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या वतीने आयोजित राज्य व्यापारी परिषदेचे उद्‌घाटन सत्तार यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते. केंद्र सरकारच्या व्यापारी कल्याण बोर्डाचे अध्यक्ष सुनील सिंघी, भारतीय व्यापारी मंडळाचे अध्यक्ष बाबूलाल गुप्ता, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी, दि पूना मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया, फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष जितेंद्र शहा, वरिष्ठ उपाध्यक्ष राजेश शहा, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सूर्यकांत पाठक, चेंबर ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रीज अँड ट्रेडचे (कॅमिट) अध्यक्ष मोहन गुरनानी, ग्रेन अँड राइस ऑइल सीड असोसिएशनचे अध्यक्ष शरद मारू आदी मान्यवर उपस्थित होते.

या परिषदेसाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने व्यापारी उपस्थित होते. भाषणादरम्यान अनेक व्यापाऱ्यांनी बाजार समिती कायदा रद्द करण्याबरोबरच जीएसटी कायद्यातील जाचक तरतुदी रद्द करण्याची मागणी केली.

व्यापाऱ्यांनी मांडलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने सत्तार म्हणाले, ''बाजार समित्यांना पर्याय म्हणून खासगी बाजार समित्या, थेट पणन, मॉडेल कायद्याची निर्मिती केली. यामुळे काही प्रमाणात बाजार समित्यांना पर्याय निर्माण झाले आहेत. मात्र सरसकट बाजार समिती कायदा रद्द करा, बाजार समित्या बंद करणे शक्य होणार नाही. बाजार समित्या शेतकऱ्यांना केंद्रबिंदू ठेवून निर्माण केल्या आहेत. बाजार समिती कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करेल. यासाठी व्यापारी संघटनांच्या पदाधिकारी आणि मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांबरोबर बैठक घेऊन पणन कायद्यातील बदलांचे विधेयक आगामी हिवाळी अधिवेशनात आणण्यासाठी प्रयत्न केले जातील. जीएसटीतील जाचक तरतुदींबाबत केंद्र सरकारला पत्र देऊन त्या दूर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करू.''

सिंघी म्हणाले, ''केंद्राच्या व्यापारी कल्याण बोर्डाच्या धर्तीवर प्रत्येक राज्यात व्यापारी कल्याण बोर्ड आणि जिल्हा स्तरावर समित्या स्थापन करण्यात येणार आहेत. या समित्यांच्या माध्यमातून व्यापाऱ्यांच्या समस्या सोडविल्या जातील.''

राजेंद्र बाठिया यांनी प्रास्ताविक केले. विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी मनोगते व्यक्त केली.

## 'अन्न पदार्थांची चाचणी दुर्घटना टाळण्यासाठी गरजेची'

''व्यावसायिक व व्यापाऱ्यांना अन्नपदार्थांची चाचणी करणे जाचक वाटते. मात्र, त्यामध्ये होणारी भेसळ आणि त्यामुळे होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी ही चाचणी महत्त्वाचीच आहे. बदलत्या काळानुसार स्वतः अद्ययावत होण्याबरोबरच आवश्यक प्रशिक्षण घेण्याची गरज आहे. त्यासाठी प्रशासनाकडून सर्व प्रकारचे सहकार्य केले जाईल,'' असे मत अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त सुरेश अन्नापुरे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य व्यापारी परिषदेच्या दुसऱ्या सत्रामध्ये 'वस्तू व सेवा कर (जीएसटी), अन्न सुरक्षा कायदा व बाजार समिती कायदा' या विषयावर चर्चासत्र झाले. या वेळी वस्तू व सेवा कर विभागाचे सहआयुक्त राजेंद्र अडसूळ, पणन संचालक केदारी जाधव, माजी संचालक सुनील पवार, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड अॅग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित शहा, दि. पूना मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठीया, माजी अध्यक्ष प्रवीण चोरबेले, फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष जितेंद्र शहा उपस्थित होते.

अन्नापुरे म्हणाले, ''आमच्या विभागाकडून प्रशिक्षणाची गरज असणाऱ्यांना योग्य प्रशिक्षणही दिले जाते. त्यामध्ये देखील अतिजोखमीच्या पदार्थांपासून वेगवेगळ्या टप्प्यानुसार वर्गीकरण केलेले आहे.''

याप्रसंगी अडसूळ व जाधव यांनी मार्गदर्शन केले.

### परिषदेत मांडलेले मुद्दे

- कर्ज व अर्थपुरवठा व्यवस्थित करावा
- व्यापाऱ्यांना बाजार समितीवर काम करण्याची संधी द्यावी
- अन्न व औषध प्रशासन विभागाकडून होणारा अन्याय थांबवावा
- अन्न व औषध प्रशासन विभागाने व्यावसायिक, व्यापाऱ्यांना मोफत प्रशिक्षण द्यावे

# व्यापाऱ्यांच्या समस्या कायद्याच्या चौकटीत सोडवण्यासाठी प्रयत्न : अब्दुल सत्तार

**पुणे** : शेतकरी आणि व्यापारी केंद्रबिंदू आहेत. व्यापाऱ्यांना विविध समस्या भेडसावत आहेत. वस्तू आणि सेवा कर कायद्यातील (जीएसटी) तरतुदींना राज्यभरातील व्यापाऱ्यांनी विरोध दर्शवला आहे. व्यापाऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्या तसेच त्यांच्या मागण्या हिवाळी अधिवेशनात मांडू. कायद्याच्या चौकटीत व्यापाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन राज्याचे पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीकडून व्यापारी परिषदेचे आयोजन करण्यात आले. यावेळी सत्तार बोलत होते. राष्ट्रीय व्यापारी कल्याण बोर्डाचे अध्यक्ष सुनील सिंघी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी, फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई)चे अध्यक्ष जितेंद्र शहा, चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रीज अँड ट्रेडचे अध्यक्ष मोहन गुरनानी, आदी याप्रसंगी उपस्थित होते.

सत्तार म्हणाले, कायद्यातील जाचक तरतुदींना व्यापाऱ्यांनी विरोध दर्शवला आहे. जीएसटी लागू झाल्यानंतर बाजार समितीच्या आवारातील कर (सेस) रद्द करण्याची मागणी व्यापाऱ्यांची आहे. व्यापार करताना अनेक समस्यांना व्यापाऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. व्यापाऱ्यांच्या समस्या कायद्याच्या चौकटीत सोडवण्यासाठी राज्य शासनाकडून प्रयत्न केले जातील. येत्या पंधरा दिवसांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत व्यापारी प्रतिनिधींची बैठक आयोजित केली जाईल. तसेच हिवाळी अधिवेशनात व्यापाऱ्यांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

Punyanagari Dt. 06/10/2023

पुढारी Dt. 06/10/2023



**महाराष्ट्र राज्य व्यापारी परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी दीपप्रज्वलन करताना अब्दुल सत्तार, सुनील सिंघी, ललित गांधी, राजेंद्र बाठिया, जितेंद्र शहा व अन्य मान्यवर.**

# व्यापाऱ्यांच्या प्रश्नांबाबत पंधरवड्यात बैठक

**पणनमंत्री अब्दुल सत्तार यांचे राज्य व्यापारी परिषदेत आश्वासन**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देशाच्या प्रगतीत व्यापाऱ्यांचे मोठे योगदान असून, त्यांच्या विविध मागण्यांबाबत येत्या पंधरवड्यात मुंबईत व्यापारी प्रतिनिधी आणि राज्य सरकारचे सचिव यांची बैठक घेतली जाईल, असे आश्वासन पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी गुरुवारी (दि. ५) महाराष्ट्र राज्य व्यापारी परिषदेत दिले. व्यापारीवर्गाला येणाऱ्या अडचणी दूर करू, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीतर्फे पुण्यात आयोजिलेल्या राज्यव्यापी व्यापारी परिषदेत सत्तार बोलत होते. राष्ट्रीय व्यापारी कल्याण बोर्डचे अध्यक्ष सुनील सिंघी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी, फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष जितेंद्र शहा, मोहन गुरनानी, दीपेन अग्रवाल, शरद मारू, राज्य व्यापारी कृती समितीचे समन्वयक आणि पूना मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया, सूर्यकांत पाठक, बाबुलाल गुप्ता, माजी आमदार मोहन जोशी या वेळी उपस्थित होते. परिषदेला राज्यभरातून व्यापारी आले होते.

सत्तार म्हणाले, 'व्यापाऱ्यांनी आज मांडलेल्या प्रश्नांबाबत सरकारचे सचिव पातळीवरील अधिकारी आणि व्यापारी प्रतिनिधींच्या बैठकीत चर्चा करू. त्यात निघालेला मार्ग मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवण्याची मी हमी देतो. त्यांच्यासोबतही व्यापारी प्रतिनिधींची बैठक घेऊ. सेस रद्द करण्यासह बाजार समिती नियम आणि अटींमध्ये काय प्रस्तावित बदल करायचे आहेत, ते विधिमंडळातही मांडले जातील.'

सुनील सिंघी म्हणाले, 'व्यापाऱ्यांच्या हितासाठी राष्ट्रीय व्यापारी कल्याण बोर्ड स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच स्थापन झाले आहे. त्या माध्यमातून व्यापाऱ्यांचे प्रश्न सोडविले जातील. व्यापाऱ्यांना वयाच्या साठीनंतर ३ हजार रुपये पेन्शन देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. सर्व प्रकारच्या परवान्यांसाठी एक खिडकी योजना राबवली जाणार आहे.'

राजेंद्र बाठिया यांनी प्रास्ताविकात व्यापाऱ्यांच्या विविध मागण्यांचा आढावा घेतला. ते म्हणाले, 'दुहेरी कर आकारणी रद्द करावी. परंपरागत व्यापार नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. मार्केट आवारातील ४० टक्के व्यापार कमी झाला असून, तो टिकविण्यासाठी राज्यातून सेस हद्दपार केला पाहिजे.'

ललित गांधी, जितेंद्र शहा, गुप्ता, अग्रवाल, पाठक यांनीही व्यापाऱ्यांचे प्रश्न मांडले. बाजार समिती सेस रद्द व्हावा, एपीएमसीचे कालबाह्य कायदे दुरुस्त करावे, एफएसएसएआय कायद्याच्या आणि जीएसटीच्या जाचक अटी रद्द कराव्यात आदी मागण्या या वेळी विविध व्यापारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केल्या. चेंबरचे सचिव रायकुमार नहार यांनी स्वागत केले. अजित बोरा, ईश्वर नहार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. दिनेश मेहता यांनी आभार मानले.

Pune Edition
Oct 6, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

Maha.Times Dt. 06/10/2023

# व्यापाऱ्यांच्या मागण्या मांडणार

## पणनमंत्री अब्दुल सत्तार यांचे आश्वासन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'व्यापाऱ्यांना भेडसावणाऱ्या वस्तू आणि सेवा कर कायद्यातील (जीएसटी) तरतुदी, विविध समस्या आणि त्यांच्या मागण्या हिवाळी अधिवेशनात मांडू,' असे आश्वासन पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी गुरुवारी दिले.

'येत्या १५ दिवसांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत राज्यभरातील व्यापारी प्रतिनिधींची बैठक आयोजित करून या प्रश्नांवर चर्चा करण्यात येईल,' असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीकडून व्यापारी परिषदेचे गुरुवारी आयोजन करण्यात आले होते. या वेळी सत्तार बोलत होते. राष्ट्रीय व्यापारी कल्याण बोर्डाचे अध्यक्ष सुनील सिंघी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी, फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे (मुंबई) अध्यक्ष जितेंद्र शहार, चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रीज अँड ट्रेडचे अध्यक्ष मोहन गुरनानी, 'कॉमेट'चे अध्यक्ष दीपेन अगरवाल, द ग्रेन राइस अँड ऑइल सीड्स मर्चंट्स असोसिएशनचे अध्यक्ष शरद मारू, द पूना मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया, ज्येष्ठ व्यापारी राजेश शहा, ग्राहक पेठेचे संचालक सूर्यकांत पाठक, पुणे व्यापारी महासंघाचे सचिव महेंद्र पितळिया, मर्चंट्स चेंबरचे सचिव रायकुमार नहार आदी उपस्थित होते.

सत्तार म्हणाले, 'जीएसटी कायदा लागू झाल्यानंतर बाजार समितीच्या आवारातील कर (सेस) रद्द करण्याची मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे.'

'व्यापाऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या पंतप्रधान, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यापुढे मांडू,' असे सिंघी यांनी सांगितले.

'राज्यात खाद्यान्न आणि संबधित व्यापार क्षेत्रावर सुमारे तीन कोटी जनता प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे अवलंबून आहे. पारंपरिक व्यापार टिकण्यासाठी सेस रद्द होणे आवश्यक आहे,' असे बाठिया म्हणाले.

### व्यापाऱ्यांनी मांडलेले मुद्दे

- जीएसटी कायद्यातील काही तरतुदी प्रामाणिक करदात्यावर अन्याय करणाऱ्या आहेत.
- बाजार समिती कायद्यात कालानुरूप बदल करण्यात यावेत.
- बहुतांश खाद्यान्न वस्तूंवर पाच टक्के जीएसटी लागू करण्यात आला आहे. त्यापैकी अर्धा महसूल राज्याला मिळतो.
- व्यापाऱ्यांकडून बाजार समिती कर (सेस) आकारण्यात येतो.
- राज्यात दुहेरी करआकारणी होत असून, दुहेरी करांची झळ ग्राहकांना बसते.

> पारंपरिक व्यापार करताना अनेक समस्यांना व्यापाऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. व्यापाऱ्यांच्या समस्या कायद्याच्या चौकटीत सोडविण्यासाठी सरकारकडून प्रयत्न केले जातील.
>
> – अब्दुल सत्तार, पणनमंत्री

Lokmat Dt. 06/10/2023

# व्यापाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील

## १५ दिवसांत मुंबईत घेणार बैठक; पणनमंत्री अब्दुल सत्तार यांची ग्वाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : व्यापाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत येत्या १५ दिवसांत मुंबईत व्यापक बैठक घेतली जाईल. वस्तू आणि सेवा कर कायद्यातील (जीएसटी) तरतुदींना राज्यभरातील व्यापाऱ्यांनी विरोध दर्शविला आहे. तसेच व्यापाऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांबाबत विविध मागण्या येत्या हिवाळी अधिवेशनात मांडू आणि व्यापाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करु असे आश्वासन राज्याचे पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या वतीने राज्य स्तरीय व्यापारी परिषद स्वारगेट येथील गणेश कलारंगमंच येथे गुरुवारी घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय व्यापारी कल्याण बोर्डाचे अध्यक्ष सुनील सिंघी, एमसीसीआयएचे अध्यक्ष ललित गांधी, एफएएमचे (मुंबई) अध्यक्ष जितेंद्र शहार, उपाध्यक्ष राजेश शाह, मोहन गुरनानी, दीपेन अग्रवाल, शरद मारू, दी पूना मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया, माजी आमदार मोहन जोशी, माजी अध्यक्ष प्रवीण चोरबेले, ग्राहक पेठेचे संचालक सूर्यकांत पाठक, महेंद्र पितळीया, रायकुमार नहार इ. उपस्थित होते. यावेळी पुणेरी पगडी व सन्मानचिन्ह देऊन सत्तार यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी राजेंद्र बाठिया यांनी प्रास्ताविकात व्यापाऱ्यांच्या विविध मागण्यांचा आढावा घेतला. यावेळी जितेंद्र शहार, बाबूलाल गुप्ता, दीपेन अग्रवाल, सुरेंद्र पाठक यांनीही व्यापाऱ्यांचे प्रश्न मांडले. दिनेश मेहता यांनी आभार मानले.



महाराष्ट्र राज्य व्यापारी परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी दीपप्रज्वलन करताना राज्याचे पणनमंत्री अब्दुल सत्तार, सुनील सिंघी, ललित गांधी, राजेंद्र बाठिया, जितेंद्र शहा.

- सुनील सिंघी म्हणाले, व्यापाऱ्यांच्या हितासाठी राष्ट्रीय व्यापारी कल्याण बोर्ड आहे. व्यापाऱ्यांना त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी रस्त्यावर उतरण्याची गरज पडणार नाही. संघटनेच्या माध्यमातून आपण एकत्रितरीत्या संवाद साधून समस्या सोडवू शकतो.
- ललित गांधी म्हणाले, खाद्यान्नावर जीएसटी आहे. जीएसटी कायद्यातील काही तरतुदी करदात्यांवर अन्याय करणाऱ्या आहेत. बाजार समिती कायद्यात कालानुरूप बदल करण्यात यावेत. व्यापाऱ्यांच्या विविध मागण्यां-संदर्भात सरकारकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

Kesari Dt. 06/10/2023

# 'बाजार समित्या बंद होणार नाहीत'

**पुणे :** शेतकऱ्यांच्या मालाचे योग्य वजन आणि रास्त भाव मिळावा, या हेतूने बाजार समित्यांची स्थापना करण्यात आली. त्यामुळे त्या बंद करणे शक्य नाही. परंतु बाजार समिती कायद्यातील काही तरतुदी जाचक असतील आणि त्याचा त्रास व्यापाऱ्यांना होत असल्यास त्यात बदल करण्यासाठी व्यापारी संघटनांची बैठक घेऊ. या बदलांबाबतचे विधेयक आगामी हिवाळी अधिवेशनात आणण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासन पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी गुरुवारी दिले.

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या वतीने आयोजित राज्य व्यापारी परिषदेचे उद्घाटन सत्तार यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते. ते म्हणाले, या परिषदेसाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने व्यापारी उपस्थित होते. भाषणादरम्यान अनेक व्यापाऱ्यांनी बाजार समिती कायदा रद्द करण्याबरोबरच जीएसटी कायद्यातील जाचक तरतुदी रद्द करण्याची मागणी केली.


सत्तार म्हणाले, बाजार समित्यांना पर्याय म्हणून खासगी बाजार समित्या, थेट पणन, मॉडिल कायद्याची निर्मिती केली. यामुळे काही प्रमाणात बाजार समित्यांना पर्याय निर्माण झाले आहेत. मात्र सरसकट बाजार समिती कायदा रद्द करा, बाजार समित्या बंद करणे शक्य होणार नाही. बाजार समित्या शेतकऱ्यांना केंद्रबिंदू ठेवून निर्माण केल्या आहेत. बाजार समिती कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करेल. यासाठी व्यापारी संघटनांच्या पदाधिकारी आणि मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांबरोबर बैठक घेऊन पणन कायद्यातील बदलांचे विधेयक आगामी हिवाळी अधिवेशनात आणण्यासाठी प्रयत्न केले जातील. जीएसटीतील जाचक तरतुदींबाबत केंद्र सरकारला पत्र देऊन त्या दूर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करू.

Loksatta Dt. 05/10/2023

# हळद निर्यात १०० कोटी डॉलरवर नेण्याचे लक्ष्य

## राष्ट्रीय हळद मंडळाची स्थापना

पीटीआय, नवी दिल्ली



**केंद्र सरकारने** राष्ट्रीय हळद मंडळाची स्थापना बुधवारी केली. या मंडळाद्वारे हळदीचे उत्पादन आणि निर्यात वाढविली जाणार आहे. हळदीचे औषधी गुणधर्म असल्याने तिच्या निर्यातीवर प्रामुख्याने भर दिला जाईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय हळद मंडळाच्या स्थापनेची घोषणा मंगळवारी केली होती, त्या अनुषंगाने बुधवारी अधिसूचनाही काढण्यात आली.

हळद मंडळाची स्थापना करावी, अशी महाराष्ट्र, तेलंगण, मध्य प्रदेश आणि कर्नाटक या राज्यांतील शेतकऱ्यांची दीर्घ काळापासून मागणी होती. याबाबत केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर म्हणाले की, भारताची हळदीची वार्षिक निर्यात २०३० पर्यंत ८,४०० कोटी रुपयांवर (१०० कोटी डॉलर) नेण्याची योजना सरकारने आखली आहे. सध्या हळदीची निर्यात १,६०० कोटी रुपये आहे.

हे मंडळ हळदीच्या संशोधन आणि विकासाला चालना देणार आहे. हळद उत्पादकांची क्षमता विस्तारणे आणि कौशल्य विकास यावरही भर दिला जाणार आहे. हळदीची गुणवत्ता आणि अन्न सुरक्षा मानके यांना प्रोत्साहन देण्याचे काम मंडळ करणार आहे.